# बेरार फायनान्स लिमिटेड

कॉर्पोरेट आयडेंटिटि क्रमांक (सीआयएन): U65929MH1990PLC057829
नोंदणीकृत कार्यालयः अविनिशा टॉवर, मेहाडिया चौक, धंतोली, नागपूर-४४००१२.
फोन क्र. ०७१२-६६६३९९९
ईमेलः info@berarfinance.com, संकेतस्थळः www.berarfinance.com

## पोस्टल बॅलट सूचना आणि ई-मतदानाची माहिती

ह्याव्दारे सूचना देण्यांत येते कि, कंपनीच्या "आर्टिकल्स ऑफ असोसिएशन" मधे करण्यात आलेल्या सुधारणा, पुनःनिवेदन व सहजपणे उल्लघन न करता येणाऱ्या बाबींवर कंपनी सभासदांकडून मान्यता प्राप्त करू इच्छिते. उपरोक्त ठरावाव्दारे पूर्तता करण्यांत आलेल्या व विचाराधीन असणाऱ्या सूचनांबाबत कंपनी कायदा २०१३ मधिल वर्ग ५ आणि १४ व अन्य लागू असणाऱ्या तरतूदीं विचारात घेऊन व तशि पूर्तता करून २७ ऑक्टोबर २०२० रोजी प्रसारित करण्यांत येणाऱ्या "पोस्टल बॅलट" नोटीस मधे अंतर्भूत केलेल्या असून सदरची पोस्टल बॅलट नोटीस कंपनीची वेबसाइट **www.berarfinance.com** आणि बीएसई लिमिटेड चे संकेतस्थळ **www.bseindia.com** वर उपलब्ध आहे.

निगम व्यवहार मंत्रालयाव्दारे जारी सर्क्युलर क्र १४/२०२० दिनांक ८ एप्रिल, २०२०, सर्क्युलर क्र. १७/२०२० दिनांक १३ एप्रिल, २०२० आणि सर्क्युलर क्र. ३३/२०२० दिनांक २८ सप्टेंबर, २०२० च्या अनुपालनात कंपनीने शुक्रवार, ३० ऑक्टोबर, २०२० (कट ऑफ तारीख) रोजीस डिपॉझिटरीज कडे असलेले लाभकारी मालकांचे रजिस्टर किंवा कंपनीच्या सभासद रजिस्टरमध्ये नावे असलेल्या आणि कंपनी/डिपॉझिटरीजकडे ई-मेल पत्ते नोंदविलेल्या सभासदांना फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमाने १० नोव्हेंबर २०२० रोजी पोस्टल बॅलट सूचना पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे. सभासदांनी सहमती किंवा असहमतीचा पत्रव्यवहार फक्त दुरस्थ ई-मतदान पद्धतीमार्फत घेण्यात येईल.

कंपनी तिच्या सभासदांना दूरस्थ ई-मतदान सुविधा पुरविण्यासाठी सेंट्रल डिपॉझिटरीज सर्विसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) च्या सेवेसह जोडली गेली आहे. दूरस्थ ई-मतदानाचा कालावधी बुधवार, ११ नोव्हेंबर २०२० रोजी स. ९.०० वा. (भाप्रवे) पासून सुरु होईल आणि गुरुवार, १० डिसेंबर, २०२० रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे) संपेल. ई-मतदान मॉड्युल त्यानंतर सीडीएसएल व्दारे बंद करण्यात येईल. सभासदांचे मतदानाचे हक्क कट ऑफ तारखेस कंपनीच्या भरणा झालेल्या भाग भांडवलातील त्यांच्या ईक्वीटी कॅपीटलच्या प्रमाणात राहतील. फक्त तेच सभासद ज्यांची नावे कट ऑफ तारखेस डिपॉझिटरीज कडे असलेले लाभकारी मालकांचे रजिस्टर किंवा कंपनीच्या सभासद रजिस्टरमध्ये नोंदविलेली असतील ते दूरस्थ ई-मतदानाव्दारे त्यांच मतदान करण्यासाठी हक्कदार राहतील. सभासदाने ठरावावर एकदा केलेल्या मतदानात त्याला/तिला त्यानंतर बदल करण्याची परवानगी देण्यात येणार नाही. जो व्यक्ति कट-ऑफ तारखेपर्यंत सदस्य नाही आहे, त्यांनी केवळ सूचना उद्देशाने या नोटिस कडे बघावे.

ज्या सभासदांनी कंपनी/डिपॉझिटरीजकडे ई-मेल पत्ते नोंदविलेले नाहीत, त्यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे नोटस मध्ये दिलेल्या प्रक्रियेचे पालन करुन ती नोंदवू शकता.

ईमेल पत्त्याच्या नोंदणीची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे :

अ) रिमोट ई-मतदानाव्दारे पोस्टल बॅलेटमध्ये प्रस्तावित केलेल्या ठरावामध्ये मतदानासाठी, ज्या सदस्यांनी आपला ईमेल पत्ता नोंदविला नाही, त्यांचा ईमेल पत्ता **deepali.balpande@berarfinance.com** वर ईमेल पाठवून नोंदवू शकता. सदस्यांनी त्यांची माहिती ही ईमेल व्दारे द्यावी.

भौतिक स्वरुपात समभाग असतील त्यांनी त्यांचा फोलीओ क्रमांक, भागधारकाचे नाव, समभाग प्रमाणपत्राची (शेअर सर्टीफिकेट) स्कॅन प्रत (पुढील आणि मागील बाजू), पॅनकार्ड (स्वतः प्रमाणित केलेली पॅनकार्डची स्कॅनप्रत), आधार कार्ड (स्वतः प्रमाणित केलेली आधार कार्डची स्कॅन प्रत)

डीमेट स्वरुपात समभाग असतील त्यांनी आपला ( सीडीएसएल १६ बेनिफिशीअरी आयडी किंवा एनएसडीएल १६ अंकी - DPID+ CLID) भागधारकाचे नाव, क्लाईंट मास्टर किंवा जमाखर्च तपशील, पॅन कार्ड, (स्वतः प्रमाणित कलेली पॅनकार्डची स्कॅन प्रत), आधार कार्ड (स्वतः प्रमाणित केलेली आधार कार्डची स्कॅन प्रत)

ब) ईमेलची यशस्वी नोंदणी नंतर सदस्याला पोस्टल मतपत्रिकेच्या नोटीसची कॉपी व ईमतदान प्रक्रियेसह युजर आयडी आणि पासवर्ड हा ई-मतदान करण्यासाठी प्राप्त होईल. काही शंका असल्यास मेंबर deepali.balpande@berarfinance.com वर लिहू शकता.

कंपनीच्या संचालक मंडळाने मोकळ्या आणि पारदर्शक बाबीमध्ये दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेमार्फत पोस्टल बॅलट घेण्यासाठी परिनिरिक्षक म्हणून मेसर्स एसपीझेड अॅन्ड असोसिएटस, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज यांचे श्री सुनिल झोरे (सीपीसी क्र. ११८३७) यांची नियुक्ती केली आहे.

उपरोक्त पोस्टल बॅटल चा निकाल शनिवार, १२ डिसेंबर २०२० रोजी अथवा त्यापूर्वी जाहीर करण्यांत येईल. प्रस्तुत ठराव जर आवश्यक बहुमताने पारित झाला तर तो दूरस्थ (रिमोट) ई-मतदानाच्या अंतिम दिवशी अर्थात डिसेंबबर १०, २०२० रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार साय. ५.०० वाजता पारित झाला असे विचारांत घेतले जाईल. सदर निकाल व निरिक्षकांचा अहवाल (स्कृटिनायजर्स रिपोर्ट) बी.एस.ई. ला कळविण्यात येईल जेथे कंपनीचे अपरिवर्तनीय रोखे (नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्स) लिस्टेड आहेत तसेच कंपनीच्या www.berarfinance.com ह्या संकेतस्थळावर आणि कंपनीच्या पंजीकृत कार्यालयात प्रदर्शित करण्यांत येतील.

ई-मतदानासंबंधी काही प्रश्न किंवा अडचणी असतील तर सभासद वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि ई-मतदान करण्यासाठी भागधारकांना उपयोगी पडणारी नियमावली व ई मतदान पुस्तिका www.evotingindia.com वर पाहू शकतात किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल लिहा किंवा श्री नितीन कुंदर(०२२-२३०५८७३८) किंवा श्री मेहबूब लखानी(०२२-२३०५८५४३) किंवा श्री राकेश दळवी (०२२-२३०५८५४२) वर संपर्क करा.

इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याच्या सुविधेशी संबंधित सर्व तक्रारींचे निवारण श्री राकेश दळवी, (सीडीएसएल), सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस(इंडिया) लिमिटेड ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्यूचरेक्स, मफतलाल मिल कंपाऊंड्स, एनएम जोशी मार्ग, लोअर परळ(पूर्व), मुंबई-४०००१३ किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल पाठवा किंवा ०२२-२३०५८५४२/४३ वर कॉल करा.

मंडळाच्या आदेशान्वये
बेरार फायनान्स लिमिटेड करता,
सही/-

स्थळः नागपूर
दिनांकः १०/११/२०२० (इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल) दीपाली बालपांडे (कंपनी सेक्रेटरी)